**RNI No. MAHBIL/2009/36619**

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

**वर्ष ७, अंक ६४]** **गुरुवार, डिसेंबर २३, २०२१/पौष २, शके १९४३** **[ पृष्ठे ७, किंमत : रुपये ११.००**

**असाधारण क्रमांक ९२**

**प्राधिकृत प्रकाशन**

### सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांजकडून भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम क्र. ११ ची

### अधिसूचना

क्रमांक उजि/भूसं(समन्वय)/टे-१/रा.द.दा.ए./रस्ता/प्रजिमा-४९/२०२१ .— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण. ११/२०१४/प्र.क्र.७७(पार्ट-२)/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ‘‘उक्त अधिसूचना’’ असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूमिसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या ‘‘अनुसूची एक’’ मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश ‘‘उक्त जमीन’’ असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त ‘‘सार्वजनिक प्रयोजन’’ असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या ‘‘अनुसूची दोन’’ मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची रायता-दहागाव-दापिवली-एरंजाड रस्ता प्रजिमा-४९ किमी प्रकल्पाच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी मौजे आंबेशिव खुर्द, मौजे आंबेशिव बुद्रुक व मौजे एरंजाड, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, येथील अनुसूची दोन मध्ये दर्शविलेल्या जमिनीची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या ‘‘अनुसूची तीन’’ मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या ‘‘अनुसूची चार’’ मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या ‘‘अनुसूची पाच’’ मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदींचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३ (यात यापुढे ज्याचा निर्देश ‘‘उक्त नियम’’ असा करण्यात आला आहे) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील

जिल्हा ठाणे तालुका अंबरनाथ

| अ.क्र. | नगर भूमापन गट क्र./सर्व्हे नं. | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदीने संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| **गावाचे नाव : आंबेशिव खुर्द** | | | |
| १ | ७ | ०.२५.३० | ०.०२.१० |
| २ | ८/१ | ०.२६.३० | ०.२४.१० |
| ३ | ८/२ | ०.१७.७० | |
| ४ | ८/३ | ०.५८.०० | |
| ५ | ८/४/अ | ०.२३.०० | |
| ६ | ८/४/ब | ०.१९.०० | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ७ | ९/१ | ०.०२.५० | ०.२०.०० |
| ८ | ९/२ | ०.०४.५० | |
| ९ | ९/३/१ | ०.३७.४० | |
| १० | ९/३/२ | ०.१०.६० | |
| ११ | ९/४ | ०.००.८० | |
| १२ | ९/५ | ०.२५.९० | |
| १३ | ९/६ | ०.०१.८० | |
| १४ | ९/७ | ०.१२.२० | |
| १५ | ९/८ | ०.०६.३० | |
| १६ | ९/९ | ०.०९.०० | |
| १७ | ९/१० | ०.०४.३० | |
| १८ | १०/१/अ/ब/१ | ०.३७.५० | ०.२५.१० |
| १९ | १०/१/अ/ब/२ | ०.३८.५० | |
| २० | ११/१/१ | ०.१५.२० | ०.०९.४० |
| २१ | ११/१/२ | ०.१०.१० | |
| २२ | ११/२ | ०.११.९० | |
| २३ | ११/३ | ०.०४.३० | |
| २४ | ११/४ | ०.०२.०० | |
| २५ | ११/५ | ०.०६.१० | |
| | | **एकूण क्षेत्र** | **०.८०.७०** |
| **गावाचे नाव : आंबेशिव बुद्रुक** | | | |
| १ | १७/२ | ०.१६.०० | ०.०६.१० |
| २ | १७/७ | ०.०८.१० | ०.०२.२० |
| ३ | १७/१० | ०.११.१० | ०.०१.६० |
| ४ | १७/१४ | ०.१६.०० | ०.००.३५ |
| ५ | १५/११ | ०.०४.५० | ०.००.९० |
| ६ | १५/१२ | १.०४.२० | ०.३८.२० |
| ७ | १५/१३ | ०.०२.६० | ०.०१.२५ |
| ८ | १५/१५ | ०.१९.२० | ०.००.२५ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ९ | १५/१६ | ०.०४.५० | ०.००.२० |
| १० | १६/१३ | ०.८.१० | ०.००.७० |
| ११ | ५२/१ | १.१९.०० | ०.१४.४० |
| १२ | ५२/२ | ०.६७.०० | ०.०३.१० |
| १३ | ५२/७/अ | ०.०६.२० | ०.०३.३० |
| १४ | ५२/७/ब | ०.१४.८० | |
| १५ | ५२/७/क | ०.०२.८० | |
| १६ | ५२/७/ड | ०.२.५० | |
| १७ | ५२/११ | ०.८१.०० | ०.००.२५ |
| १८ | ५२/१२ | ०.१६.२० | ०.०८.०० |
| १९ | ५२/१४ | ०.७८.०० | ०.१३.०० |
| २० | ५२/१५/अ | ०.४०.०० | ०.०७.६० |
| २१ | ५२/१५/ब | ०.११.७० | |
| २२ | ५२/१५/क | ०.१०.१० | |
| २३ | ५२/१७ | १.०४.०० | ०.१९.७० |
| २४ | ६१/१ | ०.२३.३० | ०.२१.३० |
| २५ | ६१/५ | २.१७.५० | ०.०२.०० |
| २६ | ६१/६ | ०.१४.२० | ०.०५.०० |
| २७ | ६१/१२ | ०.०४.५० | ०.०१.६० |
| २८ | ६४/३/अ | ०.७५.७० | ०.१६.०० |
| २९ | ६४/३/ब | ०.७२.०० | |
| ३० | ६५ | ७.४४.०० | ०.५७.०० |
| ३१ | ६८/७ | ०.०८.६० | ०.०२.१० |
| ३२ | ६८/१० | ०.०३.३० | ०.००.८० |
| ३३ | ६८/१२ | ०.६९.८० | ०.०३.५० |
| ३४ | ६८/१३ | ०.०२.८० | ०.००.८० |
| ३५ | ६८/२१ | ०.०२.०० | ०.०१.२० |
| ३६ | ६८/२३ | ०.१५.२० | ०.०४.३० |
| ३७ | ६८/२४ | ०.२०.०० | ०.०४.२० |
| | | **एकूण क्षेत्र** | **२.४०.९०** |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| **गावाचे नाव : एरंजाड** | | | |
| १ | १०८/१ | ०.८४.०० | |
| २ | १०८/२ | ०.३१.०० | |
| ३ | १०८/३ | ०.५२.०० | |
| ४ | १०८/४ | ०.५७.०० | |
| ५ | १०८/५ | ०.१८.०० | |
| ६ | १०८/६ | ०.५४.०० | |
| ७ | १०८/७ | ०.०४.०० | ०.०७.७० |
| ८ | १०८/८ | २.३१.०० | |
| ९ | १०८/९ | २.१०.०० | |
| १० | १०८/१० | ०.०७.०० | |
| ११ | १०८/११ | ०.४५.०० | |
| १२ | १०८/१२ | ०.२२.०० | |
| १३ | १०८/१३ | ०.६५.०० | |
| १४ | १०७/१ | ०.३६.०० | |
| १५ | १०७/२ | १.३५.०० | |
| १६ | १०७/३/१ | ०.८९.०० | |
| १७ | १०७/३/२ | ०.२८.०० | |
| १८ | १०७/४ | ०.१७.०० | |
| १९ | १०७/५ | ०.१०.०० | |
| २० | १०७/६ | ०.०७.०० | ०.३६.३० |
| २१ | १०७/७/अ | ०.८१.०० | |
| २२ | १०७/७/ब | ०.८१.०० | |
| २३ | १०७/८/१ | ०.८७.०० | |
| २४ | १०७/८/२ | ०.६३.०० | |
| २५ | १०७/९ | ०.२३.०० | |
| २६ | १०७/१० | ०.०५.०० | |
| २७ | १०७/११ | ०.३०.०० | |
| | | **एकूण क्षेत्र** | **०.४४.००** |

## अनुसूची दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्पाचे नाव** | : | रायता-दहागाव-दापिवली-एरंजाड प्रजिमा-४९ कि.मी. २२/०० ते २४/०० हा रस्ता |
| **प्रकल्पाचे वर्णन** | : | ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील रायता -दहागाव-दापिवली-एरंजाड प्रजिमा-४९ कि.मी. २२/०० ते २४/०० हा रस्ता रुंदीकरण करणेसाठी भुसंपादन करणे. |
| **समाजाला मिळणारे लाभ** | : | अंबरनाथ तालुक्यातील रायता-दहागाव-दापिवली-एरंजाड प्रजिमा-४९ रस्त्याचे रुंदीकरणामुळे स्थानिक लोकांना त्यांचे शेतीमाल हा कल्याण व मुरबाड या ठिकाणी नेण्यास सुविधा होईल. वाहतूक सुरळीत होऊन अडथळा निर्माण होणार नाही. तसेच यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व पर्यावरण स्थिरता ह्या बाबी अभिप्रेत आहेत. |

## अनुसूची तीन

| | | |
|---|---|---|
| **बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** | : | कुणीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही. |

## अनुसूची चार

| | | |
|---|---|---|
| **सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश** | : | भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम-१० (क) अन्वये महाराष्ट्र अधिनियम, २०१३ चे कलम-१० (क) अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. |

**अनुसूची पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासनकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| **प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात अधिकाऱ्याचे पदनाम** | : | लागू नाही |
| **प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता** | : | लागू नाही |
| **ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील विस्तृत विवरण** | : | लागू नाही |

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासल्यास संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उप कलम (१) खाली अधिसूचनेत करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर, उप विभाग उल्हासनगर, पवई चौक, उल्हासनगर ०३ यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**ठिकाण :** ठाणे,
**दिनांक :** २१ डिसेंबर २०२१.

**जयराज कारभारी,**
सक्षम प्राधिकारी,
तथा उप विभागीय अधिकारी,
उल्हासनगर उप विभाग, उल्हासनगर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.